## उमेदवारांकरीता सर्व साधारण सुचना

१. स्मार्ट प्रकल्पातील प्रकल्प समन्वय व व्यवस्थापन कक्ष (पीसीएमयु), विविध प्रकल्प अंमलबजावणी कक्ष (पीआययु), विभागीय प्रकल्प अंमलबजावणी कक्ष(आरआययु), जिल्हा प्रकल्प अंमलबजावणी कक्ष (डीआययु) मधील कंत्राटी पदे भरण्याकरीता अर्ज मागविण्यात येत आहेत.

२. प्रकल्पाद्वारे प्रसिध्द करण्यात आलेल्या जाहिराती मधील विविध पदांची संख्या, त्यांच्या कामाचे स्वरुप, शैक्षणिक अर्हता व अनुभव यामध्ये गरज भासल्यास कोणत्याही प्रकारचे बदल करण्याचे पुर्ण अधिकार प्रकल्पाने राखुन ठेवले आहेत.

३. प्रकल्पाद्वारे देण्यात आलेल्या जाहिरातीमधील पदे पूर्णत: कंत्राटी स्वरुपाची आहेत आणि त्यांच्या सेवा प्रकल्पांने नियुक्त केलेल्या त्रयस्थ मनुष्यबळ पुरवठा संस्थेमार्फत घेण्यात येणार आहेत.

४. निवड झालेले उमेदवार हे प्रकल्पाच्या आस्थापनेवर नसुन प्रकल्पाद्वारे नियुक्त केलेल्या त्रयस्थ मनुष्य बळ संस्थेच्या हजेरीपटावर राहतील.

५. कंत्राटी पदांसाठी आवश्यक ती शैक्षणिक अर्हता, अनुभव , कमाल मानधन , मुख्यालय व वयोमर्यादा याबाबतचे तपशील प्रकल्पाच्या संकेतस्थळावर उपलब्ध आहे.

६. उमेदवारांना एकापेक्षा अधिक कंत्राटी पदांसाठी अर्ज करावयाचा असलयास, त्यांनी प्रत्येक पदासाठी स्वतंत्र अर्ज करावा. उमेदवारांनी प्रकल्पाने संकेतस्थळावर उपलब्ध करुन दिलेल्या विहीत नमुन्यातच अर्ज सादर करणे आवश्यक आहे.

७. उमेदवारांनी ज्या पदासाठी अर्ज केलेला आहे त्या पदाचा उल्लेख लिफाफ्यावर स्पष्टपणे करावा.

८. अर्जासोबत शैक्षणिक अर्हता व अनुभव इ. कागदपत्रे / प्रमाणपत्र स्वस्वाक्षांकीत करुन सादर करणे अनिवार्य आहे. तसे नसल्यास अर्ज विचारात घेतला जाणार नाही. तसेच अर्जावरील फोटो वर स्वाक्षरी करावी. स्वाक्षरी करतांना अर्धी फोटोवर व अर्धी (काही भाग) अर्जावर येईल अश्या पध्दतीने करावी.

९. उमेदवारांनी दि.२०/०१/२०२२ रोजी सायंकाळी ५.३० वाजेपर्यंत अर्ज (Hard copy) संबंधित प्रमाणपत्रांसहीत बंद लिफाफ्यामध्ये प्रकल्प कार्यालयास सादर करावा . वर नमुद विहीत वेळेनंतर प्राप्त होणारे अर्ज ग्राहय धरले जाणार नाहीत. पोस्टाच्या अथवा कुरीयरच्या कारणांमुळे अर्ज विहीत मुदतीत / वेळेत प्राप्त न झाल्यास त्यास प्रकल्प कार्यालय जबाबदार राहणार नाही. कोणत्याही परिस्थितीत उशीरा आलेले अर्ज ग्राहय धरले जाणार नाही.

१०. प्रकल्प अंमलबजावणी कक्ष (कृषि) अंतर्गत येणाऱ्या विभागीय अंमलबजावणी कक्ष व जिल्हा अंमलबजावणी कक्ष येथील पदांसाठी अर्ज करताना मुख्यालयाबाबत प्राधान्यक्रम नमूद करावा.

११. विविध पदांसाठी प्राप्त होणाऱ्या व त्यामधून पात्र ठरणाऱ्या अर्जांची संख्या विचारात घेऊन निवड प्रक्रियेबाबत धोरण ठरविण्यात येईल म्हणजेच लेखी परीक्षा आणि / किंवा मुलाखती घेण्याबाबतचा निर्णय घेण्यात येईल, व तो प्रकल्पाच्या संकेतस्थळावर जाहीर करण्यात येईल.

१२. प्रत्येक पदाकरीता जाहिरातीमध्ये नमूद वेतन / मानधन हे प्रकल्प कालावधीपर्यंत विहीत केलेल्या वेतनाची / मानधनाची कमाल मर्यादा आहे. तथापि निवड झालेल्या उमेदवारांचे वेतन / मानधन कमाल मर्यादेपेक्षा कमी असू शकेल व ते प्रकल्पाच्या धोरणानुसार अंतिम करण्यात येईल.

१३. निवड प्रकियेकरीता उमेदवारास आलेल्या प्रवास खर्च अथवा अन्य कोणत्याही प्रकारचा खर्च प्रकल्पाद्वारे अदा करण्यात येणार नाही.

## General instructions for the candidates

1. Applications are invited from eligible candidates for various contractual posts at Project Coordination and Management unit (PCMU), Project Implementation Unit (PIUs), District Implementation Units (DIUs) & Regional Implementation Unit (RIUs) of SMART Project.
2. The Project reserves the right for any change in advertisement in respect of No. of posts, job description, educational qualification and experience, if needed.
3. The advertised posts are of purely contractual nature and their services will be sought by the project through HR Cum Placement Agency appointed by the project.
4. Shortlisted contractual candidates will be on the payroll of HR Cum Placement Agency appointed by the project.
5. The details of posts, educational qualification, experience, maximum remuneration, headquarter and age limit etc. is available on the project website.
6. The eligible candidates can apply to more than one post, but separate application for each post is to be submitted. Candidate must submit his application in prescribed format uploaded on project website.
7. Candidates must mention the name of the post applied for on the top of the envelope.
8. Candidates have to submit self-attested documents related to their educational qualification, experience etc. Applications without documents required as proof of qualification and experience will not be accepted. Claim for certain qualification, experience needs to be supported by relevant documents. The photograph attached on the application should also be signed in such a way that half part of signature should be on the photo and half part should be on the application.
9. Candidates have to submit their application in hard copy with self-attested documents on or before 20/1/2022 till 5.30 pm. Project will not be responsible for postal delay. Applications received after due date and time will not be considered.
10. For the positions at Regional Implementation Units (RIUs) and District Implementation unit (DIUs) preference of headquarter should be mentioned on application.
11. Depending on the number of application and eligible candidates, the policy for shortlisting will be decided by project (i.e. whether to conduct written examination and or interview will be decided) and the same will be announced / notified on the Project website.
12. Remuneration mentioned for each position is of upper limit. However as per policy of project shortlisted candidates may be offered lesser or appropriate remuneration.

१३. Expenditure incurred by candidates on travelling or other account will not be borne by the project.